उद्योग वाढीसाठी कोविड -१९ च्या
पश्:चात राज्य शासनामार्फत
करण्यात येत असलेल्या उपाययोजना

# महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : साप्रोयो २०२०/ प्र.क्र/७३/ उद्योग-८
दिनांक- ६ जुलै, .२०२०

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र राज्य औद्योगिकदृष्टया सर्वात प्रगत राज्य म्हणुन नावलौकिक प्राप्त राज्य असून देशांतर्गत व थेट परकीय गुंतवणूकीत अग्रेसर राज्य आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नापैकी १५% वाटा राज्य शासनाचा असून सर्वात जास्त रोजगार देणारे राज्य देखील आहे. गत १५ वर्षातील सांख्यिकी माहिती पाहता राज्यात देशांतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूण थेट परकीय गुंतवणूकीच्या ३०% पेक्षा अधिक गुंतवणूक महाराष्ट्रात झालेली दिसून येते. राज्यात मेक इन इंडिया सप्ताह-२०१६, मॅगनेटीक महाराष्ट्र-२०१८, उपक्रमाद्वारे औद्योगिक गुंतवणूकवाढीसाठी भरीव प्रयत्न करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त विविध प्रदर्शने, चर्चासत्रे, रोड-शोद्वारे गुंतवणूक आकर्षित करण्याकरिता प्रयत्न करण्यात आले आहेत.

यासह राज्य शासनामार्फत नविन औद्योगिक धोरण-२०१९ व विविध क्षेत्रिय औद्योगिक धोरण निश्चित करण्यात आले आहेत. राज्य शासनाच्या सामुहिक प्रोत्साहन योजनेद्वारे देण्यात येणारी प्रोत्साहने अन्य राज्यांच्या तुलनेत आकर्षक आहेत.

२. "कोविड-१९" महामारीमुळे जागतिक स्तरावर आर्थिक व औद्योगिक प्रगतीत अमुलाग्र शिथिलता आलेली आहे. कोविड-१९ विषाणूचा प्रार्दुभाव सुरु असलेल्या लगतच्या देशांमधून अनेक जागतिक दर्जाच्या उत्पादन कंपन्या एकाच देशातील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने अन्य देशातील औद्योगिक गुंतवणूकीच्या संधीचा शोध घेत आहेत. अशा गुंतवणूकदार कंपन्या त्यांच्या उत्पादन साखळीत किमान व्यत्यय येईल व किमान खर्च येईल अशा नजीकच्या पर्यायी ठिकाणांचा शोध घेत आहेत.

३. या पार्श्वभुमीवर कोविड -१९ प्रादुर्भावाच्या संकटकालीन परिस्थितीत देखील राज्यात औद्योगिक गुंतवणूक वाढीची संधी दिसून येते. अशा परिस्थितीत राज्यात परकीय गुंतवणूकदारांना आकर्षित करून उद्योग वृद्धीसाठी कोणत्या उपाय योजना कराव्यात या संदर्भात मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यास गटाने जागतिक दर्जाच्या बहुराष्ट्रीय व देशांतर्गत कंपन्यांना महाराष्ट्र राज्यात गुंतवणूक करण्यास सुलभ व्हावे यास अनुरूप परिणामकारक अभिनव अशा उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत.

**शासन निर्णय:**

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, "मॅग्नेटीक महाराष्ट्र वन बिझनेस" या उपक्रमाच्या माध्यमातुन खालील उपाययोजना अंमलात आणण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१) **महापरवाना/जलद ना-हरकत परवाने उपलब्ध करणे (Automatic/Accelerated permissions)**

राज्य शासनातर्फे व्यवसाय सुकर्ता अभियान (Ease of Doing Business) द्वारे विविध सुधारणा करण्यात आल्या असून उद्योग उभारणीकरिता आवश्यक विविध परवाने एकत्रित रित्या जलदगतीने व पारदर्शक पध्दतीने उपलब्ध करुन देण्याकरिता एक खिडकी योजना- मैत्री कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सद्यस्थितीत मैत्री कक्षामार्फत विविध १६ प्रशासकीय विभागांतर्गत उद्योग व्यवसायाशी निगडीत ४२ सेवा ऑनलाईन पुरविण्यात येत आहेत. सदर सेवा विहीत कालमर्यादेत संबधित विभागाकडून देण्याबाबत महाराष्ट्र राज्य सेवा हमी अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आले आहेत. मैत्री कक्षातर्फे संबंधित प्रशासकीय विभागाच्या समन्वयाने काही सेवा थेट ऑनलाईन पध्दतीने पुरविण्यात येत आहेत, तथापि सदर सेवांपैकी काही सेवा संबंधित विभागाकडून विलंबाने प्राप्त होत असल्याचे दिसून येते.

उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकदारांच्या समस्या विचारात घेता, या पुढाकारामुळे उद्योग सुरु करण्यासाठी लागणारे विविध परवाने आणि परवानग्या त्वरीत व जलदरित्या देण्याकरिता अस्त्विातील मैत्री-एक खिडकी योजनेत बदल करुन सदर परवाने अत्यंत तातडीने व स्वयंचलित (Automatic) प्रणालीद्वारे एकाच ठिकाणी देण्याचे प्रस्तावित आहे.

राज्यात येणाऱ्या सर्व थेट परकीय गुंतवणूकीचे व रु. ५० कोटी व त्यापेक्षा अधिक गुंतवणूकीच्या औद्योगिक प्रस्तावांना परिशिष्ट-१ मध्ये नमूद पुर्व उभारणी संबंधित परवानग्या उपलब्ध न करता थेट महापरवाना देण्याचा मानस आहे.

क) **महा-परवाना**: राज्यात येणाऱ्या सर्व थेट परकीय गुंतवणूकीचे व रु. ५० कोटी व त्यापेक्षा अधिक गुंतवणूकीच्या औद्योगिक प्रस्तावांना परिशिष्ट-१ मध्ये नमूद पुर्व उभारणी संबंधित परवानग्या उपलब्ध न करता बांधकाम व उत्पाद सुरु करण्यासंदर्भात शासनाचे आश्वासनपत्र असेल. सदर महापरवाना मैत्री कक्षाच्या (एक खिडकी कक्ष) संकेतस्थळावर ऑनलाईन परिपुर्ण स्वरुपात अर्ज प्राप्त झाल्यापासून ४८ तासात ऑनलाईन स्वरुपात देण्यात येईल. तसेच महापरवाना प्राप्त उद्योगांना परिशिष्ट-१ मध्ये नमूद विविध परवाने व नाहरकती कालमर्यादेत देण्याचे आश्वासित करण्यात येत आहे व विशिष्ट कालमर्यादेत सदर नाहरकती प्राप्त न झाल्यास त्यांना मानिव मान्यता देण्यात येईल.

ख) **पात्रता व वैधता**: राज्यात येणाऱ्या सर्व थेट परकीय गुंतवणूकीचे व रु. ५० कोटी व त्यापेक्षा अधिक गुंतवणूकीच्या औद्योगिक प्रस्ताव जे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाद्वारे निश्चित केलेल्या हरित व केशरी प्रवर्गातील उद्योगांना (पर्यावरण सुलभ) परिशिष्ट-१ मध्ये नमूद पुर्व उभारणी संबंधित परवानग्यासाठी पात्र राहतील. या व्यतिरिक्त घटकास अन्य परवाना / ना-हरकत आवश्यक असल्यास मैत्री – एक खिडकी कक्षाद्वारे जलद गतीने पाठपुरावा करुन उपलब्ध करुन देण्यात येईल. महापरवाना प्राप्त करण्यासाठी घटकास संबंधित यंत्रणेकडून (आवश्यक तेथे) अथवा वैयक्तिकरित्या खाजगी भुखंड उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील. ज्या औद्योगिक घटकांना त्यांच्या उत्पादनाकरिता/ प्रक्रियांकरिता पर्यावरण ना-हरकत घेण्याची आवश्यकता आहे अशा उद्योगांना प्रथम पर्यावरण विषयक नाहरकत घेण्याची अट राहील.

ग) **सक्षम प्राधिकारी:** सदर प्रकरणी पात्र घटकांना पुर्व उभारणी / बांधकाम चालू करणे / उत्पादन सुरु करणे करिता लागणाऱ्या विविध परवानेसाठी न थांबता थेट महापरवाना देण्याकरिता मैत्री कक्ष सहाय्य करील. तसेच जे पात्र घटक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यक्षेत्रात भुखंड प्राप्त आहेत अशा घटकांसाठी महापरवाना मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत प्राधिकृत अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असतील व एम.आय.डी.सी. क्षेत्राबाहेरील पात्र घटक उद्योगांकरिता विकास आयुक्त, उद्योग यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असतील. सदर महापरवाना परिशिष्ट -२ मध्ये नमूद प्रारुपात सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत देण्यात येईल.

ड) **कालमर्यादा:**

I) पात्र घटक उद्योगांना परिपुर्ण ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यापासून ४८ तासात महापरवाना देण्यात येईल. परिशिष्ट-१ मध्ये नमूद विविध नाहरकती / परवाने यांच्याशी संलग्न कालमर्यादा नमूद केले आहेत. सदर सेवा यापुर्वी मैत्री कक्षाद्वारे महाराष्ट्र राज्य सेवा हमी कायदा अंतर्गत अधिसुचित करण्यात आल्या आहेत त्यात रकाना -४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे अल्पकालावधी नुसार सुधारणा संबंधित प्रशासकीय विभागाने करुन सुधारित अधिसूचना ३० दिवसात निर्गमित कराव्यात. परिशिष्ट-१ मध्ये नमूद परवान्यांव्यतिरिक्त अन्य परवाने घटकास आवश्यक असल्यास कमाल ३० दिवसात देण्यात येतील.

II) सदर कालमर्यादेत आवश्यक परवाने संबंधित प्रशासकीय विभागाने दयावेत अथवा सदर परवाने मानिव मान्यता पध्दतीने देण्यात येतील.

२) <u>जोडा आणि वापरा (plug and play infrastructure)</u>

राज्यामध्ये नवीन व विद्यमान औद्योगिक गुंतवणूकदारांना प्रगत तंत्रज्ञान, वाजवी किंमत आणि उपयुक्तता असलेल्या गरजेनुसार बदल करणे शक्य असलेल्या लवचिक पायाभुत सोयीसुविधा पुरविण्याचे प्रस्तावित आहे. कोविड महामारीच्या विषम परिस्थितीतनंतर औद्यागिक गुंतवणूकदारांना त्यांची जोखीम कमी करुन किमान भांडवलावर उद्योग उभारणे साठी उपयुक्त ठरेल. या माध्यमातून राज्यात "जोडा आणि वापरा" तत्वावर औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्यात येतील.

१. एमआयडीसीने नवीन गुंतवणूकदारांकरिता खास डिझाइन केलेले प्लग अँड प्ले तत्वावरील जमिनी, प्रगत सुविधांसह स्वस्त किंमतीतील तयार गाळे यांची निवड करता येईल.
२. सदर भुखंड / गाळे दीर्घ/ अल्प कालावधीच्या भाडेपट्टे करारावर उपलब्ध करुन देण्यात येतील .
३. या प्रयोजनाकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ एकूण ४०,००० एकर जागा उपलब्ध करुन देईल.
४. ज्या उद्योगांमध्ये एक हजार पेक्षा अधिक कामगार आहेत त्यांना कंपनी आवारात वस्तिगृह / निवारा बांधण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ जागेची

तरतूद करेल तसेच अन्य उद्योगांसाठी देखील एम.आय.डी.सी. नियोजन आराखडात कामगार वस्तिगृहाकरिता स्वतंत्र आरक्षण ठेवेल.

५. कोविड-१९ महामारीच्या परिणामस्वरुप कामगारांच्या स्थलांतरणामुळे उद्योग घटकांना आवश्यक मनुष्यबळ प्राप्त करणे तसेच राज्यातील स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता एकत्रित माहितीचा समन्वय व सहाय्य मिळण्याकरिता औद्योगिक कामगार ब्युरो पोर्टल (Industrial employment bureau MAHA JOBS Portal) नावाने ऑनलाईन पोर्टल स्थापन करण्यात येईल याबाबत स्वतंत्र संकेतस्थळ माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मदतीने उभारण्यात येईल.

३) <u>एकत्रित शोध (Unified Search)</u>

गुंतवणूकदारास त्याच्या गुंतवणूकीविषयी सर्व प्रश्नांविषयक माहिती घेणे, अभ्यास करणे, तुलना करणे इ. साठी एक सर्व समावेशक पोर्टल तयार करणे हा या पुढाकाराचा उद्देश आहे. परकीय थेट औद्योगिक गुंतवणूकीच्या सर्व नवीन प्रस्तावांसाठी हे एक समन्वय स्थान असून गुंतवणूकीच्या संधी, पुरवठा साखळी इ. महत्वपुर्ण माहिती येथे उपलब्ध होईल. पुरवठा साखळीचे स्थानिकीकरण तसेच स्वदेशिकरण करणे आणि स्थानिक कंपन्याना विदेशी कंपन्याबरोबर भागीदारी करण्याची दुहेरी संधी याद्वारे निर्माण होईल.

४) <u>लवचिकता प्रस्तावित करणे (Building Resiliency)</u>

सुक्ष्म, लघु व मध्यम प्रवर्गातील आजारी /बंद पडलेल्या औद्योगिक घटकांना राष्ट्रीय कंपनी लवाद (NCLT) कडे दाद मागण्यास अडचणी आहेत अशा घटकांना प्रशासकीय कायदेविषयक सल्ला देण्याकरिता व वित्तीय संस्थांशी समन्वय साधण्याकरिता समन्वय कक्ष महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये स्थापन करण्यात येईल व याबाबत कार्यपध्दती व स्वरुप यथावकाश निर्गमित करण्यात येईल.

५) <u>गुंतवणूक समन्वय अधिकारी:</u>

राज्यात उद्योग व्यवसायात थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करणे तसेच देशांतर्गत गुंतवणूकीस चालना देणे याकामी विविध उद्योजक, सल्लागार, व्यापार व वाणिज्य संघटना, केंद्र शासन व परदेशी वकिलाती/ उच्चायुक्त यांच्याशी समन्वय साधण्यासाठी श्री. भुषण गगराणी, प्रधान सचिव यांची संपर्क व समन्वय अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे व त्याचा संगणक संकेतांक आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

( संजय इंगळे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१. मा.राज्यपालांचे सचिव (५ प्रत्र)

२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव (५ प्रती)

३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव (५ प्रती)

४. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक

५. मा.विरोधी पक्षनेता ,विधान परिषद / विधान सभा ,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ,मुंबई

६. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य

७. मुख्य सचिवांचे यांचे वरिष्ठ स्वीय सहायक

८. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव ,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय ,विधान भवन, मुंबई

१०. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग ,मुंबई

११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय ,मुंबई (५ प्रती)

१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई

१३. विकास आयुक्त उद्योग, उद्योग संचालनालय, मुंबई

१४.मैत्री कक्ष, मुंबई

१५. उद्योग विभागातील सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी

१६. निवड नस्ती.

Annexure 1

| S. No. | Department | Service | Notified Timeline (in days) | Proposed Timeline (in days) |
|---|---|---|---|---|
| 1. | Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) | Building Plan Approval | 30 | 7 days |
| 2. | Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) | Fire NOC | 30 | 7 days |
| 3. | Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) | Grant of Occupancy cum Completion Certificate | 8 | 8 |
| 4. | Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) | Water Connection | 15 | 7 |
| 5. | Revenue | Non-Agricultural permission | | 30 |
| 6 | Maharashtra Fire Service | Fire NOC | 30 | 7 |
| 7 | Urban Development | Building Plan Approval | 30 | 15 |
| | Urban Development | Grant of Occupancy cum Completion Certificate | 8 | 8 |
| 9 | Directorate of Industrial Safety & Health (DISH) | Factory Plan Approval | 45 | 25 |
| 10 | Labour Department | Registration under Building and Other Construction Workers (BOCW) Act | 7 | 3 |
| 11 | Energy Department | Load Sanction and Electricity Connection (from existing network) | 15 | 7 |
| 12 | Maharashtra Pollution Control Board (MPCB) | Consent to Establish (CTE) | 120 | Orange/ Green: 15 Red: 30 |
| 13 | Municipal Corporation of Greater Mumbai | Registration under Shops & Establishment Act | 01 | 01 |
| 4 | Labour Department | Registration under Shops & Establishment Act | 01 | 01 |
| 15 | Directorate of Steam Boilers | Boiler Registration | 50 | 30 |
| 16 | Directorate of Industrial Safety & Health (DISH) | Factory License | 60 | 30 |
| 17 | Maharashtra Pollution Control Board (MPCB) | Consent to Operate | 60 | Orange/ Green: 15 Red: 30 |
| 18 | Food and Drugs Administration | Drug Manufacturing License | 60 | 21 |
| 19 | Food and Drugs Administration | Issue of License to Food Business Operator for manufacturing and sale of products | 45 | 21 |

Annexure 2

**Government of Maharashtra**
**Department of Industries**
**Mantralaya, Mumbai-32**

**MAHAPARVANA**

Dt:-----------------

Mahaparvana/2020/

Sub : MAHAPARVANA for proposed unit M/s.----------------------

Ref: Your application No. ------------------- Dated ---------------

This is to acknowledge your intention for setting up industrial unit at------ ------------District---------------------- to manufacture -------------------------------- -with proposed investment of INR------- and employment ---------------------.

Government of Maharashtra hereby issues this Mahaparvana ( Automatic Approval) to grant the permission to undertake pre-establishment, pre-production and post production activities for your proposed unit mentioned above.

The Mahaparvana is being issued to assure that, all the licenses/No objection certificates/Registrations mentioned in the Annexure enclosed herewith which are required for setting up of the unit are granted within the period specified therein and will be deemed to be granted if not received within specified timeline.

Competent Authority

5.6.2020

Encl: Annexure of Permissions/clearances

To,

-----------------------------------

-----------------------------------